# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- द्धद्धःद्.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २४-२३** **दिनांक २४/०१/२०२३**

## आण्णा पॅलेस ऑर्केस्ट्रा बारवर कारवाई - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कामगिरी.

दिनांक २३/०१/२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, आण्णा पॅलेस ऑर्केस्ट्रा बार, गोडदेव रोड, नवघर, भाईंदर पूर्व ता.जि. ठाणे या बारच्या हॉलमध्ये महिला सिंगरच्या नावाखाली परवाना नसतांना मुलींकडुन नृत्य करवुन घेत असुन सदर बारचे मालक/चालक, कॅशिअर, स्टीवर्ड, पुरुष सिंगर/वादक व वेटर हे मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहित करुन नृत्य करण्यास भाग पाडत आहेत.

प्राप्त गुप्त बातमीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाचे पोलीस निरीक्षक समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबीची पुर्तता करुन बोगस गिऱ्हाईक पाठवून सत्यता पडताळुन वर नमुद बारमध्ये पोलीस पथक व दोन पंचासह २३.५५ वा. छापा कारवाई केली. सदर आस्थापनामध्ये हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावरती महिला सिंगर अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच बारचे मालक, चालक, कॅशियर, स्टीवर्ड, वेटर, पुरुष सिंगर/वादक हे बारमधील महिला सिंगर यांना अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असताना मिळुन आले. सदर कारवाई दरम्यान रोख रक्कम १०,५२०/- रु व चित्रीकरण केलेली क्लीप जप्त करुन नमुद बार आस्थापनेचे, कॅशियर-०१, चालक-०१, स्टीवर्ड- ०३, वेटर- ०५ पुरुष सिंगर/ वादक-०१, असे एकुण ११ इसमांना ताब्यात घेण्यात आले आहे तसेच पाहिजे आरोपी मालक व तपासात निष्पन्न होणारे इतर चालक यांच्याविरुध्द स.पो.उपनि. उमेश हरी पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. क्र. ४७/२०२३ महाराष्ट्र हॉटेल, उपगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम -२०१६ चे कलम ३,८(१),(२) प्रमाणे दि.२४.०१.२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. समीर अहिरराव, स.पो.उप.नि. उमेश पाटील, चा.पो.हवा. सम्राट गावडे, महिला पो.अंम. अश्विनी भिलारे सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,भाईंदर यांनी केली आहे.

------ooo------